**मुद्दा क्रमांक (सात) आपले धोरण तयार करण्याच्या किंवा त्याची अंमलबजावणी करण्याच्या संबंधात, लोकांशी विचारविनियम करण्यासाठी किंवा लोकांकडून निवेदने केली जाण्यासाठी अस्तित्वात असलेल्या कोणत्याही व्यवस्थेचा तपशील. :-**

एखादे धोरण निश्चित करायचे असल्यास ते ज्या विषयाशी संबंधित आहे तो विषय हाताळणाऱ्या कार्यासनाकडून त्याची प्रारंभिक टिपणी सादर केली जाते. त्या टिपणीवर अधिकाऱ्यांचे अभिप्राय नमूद होवून अंतत: निर्णय होतो. एखाद्या वेगळ्या व पुर्णत: नविन बाबीकरीता अगर धोरण ठरविण्याकरीता आवश्यकतेनुसार त्या-त्या विषयातील तज्ञांची समिती नियुक्त केली जाते. अशी समिती त्या बाबीविषयी आपले अभिप्राय देते. असे अभिप्राय त्या-त्या धोरणात्मक बाबीसाठी विचारात घेतले जातात.